# नियमित दिवाणी मुकदमा क्र.२७७/२०१५ मधील नि.क्र.७५ वरील आदेश

०१. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादी यांचे विरुध्द दावा मिळकतीचे वाटप होवून मिळणेकरीता व दरमहा र. रु. १५,०००/– पोटगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. १ब व १क यांचेकरीता त्यांचे विधीज्ञांनी मुद्दा क्रमांक ८ व ९ रद्द करण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ब व १क हे असे कथन करतात की, वादीचे दाव्यातील कथनानुसार प्रतिवादी क्र. १ शिवनाथ यशवंत पवार हे तिचे पती आहेत व त्यांचा विवाह दिनांक १५.०५.१९६१ रोजी झाला आहे व त्यांच्याकडून र. रु. १५,०००/– पोटगी मिळावी अशी वादीने विनंती केलेली आहे. ती पुढे असे कथन करते की, प्रतिवादी क्र. १ यांनी सदर बाब त्यांच्या कैफियतीमध्ये नाकारली आहे. वादीचा दावा व प्रतिवादी क्र. १ यांची कैफियत यातील कथनाच्या अनुषंगाने नि.क्र.७० वर न्यायालयाने मुद्दे काढले आहेत. त्यातील मुद्दा क्र. ८ व ९ पुढीलप्रमाणे आहेत.

8. Whether plaintiff is entitled for grant of maintenance at Rs. 15,000/- per month as claimed ?

9. Whether plaintiff is entitled for creating charge of maintenance on suit properties ?

०३. प्रस्तुतचा दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १ शिवनाथ यशवंत पवार हे दिनांक २५.०६.२०१९ रोजी मयत झालेले आहेत. शिवनाथ यशवंत पवार हे मयत झाले असल्यामुळे वादींची मयत शिवनाथ पवार यांच्याकडून पोटगी ठरवून मागण्याची विनंती निरर्थक झालेली आहे. त्यामुळे त्या अनुषंगाने काढलेला मुद्दा हा देखील निरर्थक झालेला आहे. करीता प्रस्तुत मुद्याच्या अनुषंगाने पुरावा देण्याची आता आवश्यकता राहिली नाही. त्यामुळे नि.क्र.७० वर न्यायालयाने काढलेले मुद्यांमध्ये दुरुस्ती करणे व वर नमूद निरर्थक झालेले मुद्दे कमी करणे आवश्यक आहे. करीता, नि.क्र.७० वर काढलेला मुद्दा क्र. ८ व ९ हे निरर्थक झाल्याने सदरचे मुद्दे कमी करणेत यावेत, अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

०४. वादी हिने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की,

प्रस्तुत अर्जातील संपूर्ण मजकूर खोटा व लबाडीचा असून वादी हिस मान्य व कबूल नाही. प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादीने वादमुद्दा कमी करणेची केलेली मागणी कायदयाला अभिप्रेत नाही. तसेच, याकामी न्यायालयाने नि.क्र.७० लगत काढलेले वादमुद्दे योग्य असून पटलावर असलेल्या अभिलेखाप्रमाणे मुद्दे काढलेले आहेत. प्रस्तुत कामातील वादी अर्धांगवायू यासारख्या गंभीर आजाराने त्रस्त असून प्रस्तुत कामकाज लांबविणेचे गैरहेतूने प्रतिवादी हे असे अर्ज देवून वादीस न्यायापासून वंचित ठेवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत आहेत. प्रतिवादीचा सदरचा अर्ज तथ्यहीन असून तो लागलीच नामंजूर करणेस पात्र आहे. तसेच, सदर वादमुद्दा नं. ८ व ९ यावर सुनावणी झाल्यानंतर त्यावर निर्णय घेणे न्यायोचित होणार आहे. करीता, वरील कारणांचा विचार होवून प्रतिवादींचा नि.क्र.७५ वरील अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे, अशी वादी हिने विनंती केली आहे.

०५. प्रस्तुत अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणाचे अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले असता ही बाब स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र. १ हे दिनांक २५.०६.२०१९ रोजी मु. पो. चितळी, तालुका – खटाव, जिल्हा – सातारा येथे मरण पावले आहेत. वादी हिने प्रतिवादी क्र. १ यांचे मृत्यूपत्राची निबंधक जन्म व मृत्यू नोंदणी कार्यालय, चितळी, तालुका – खटाव यांची सही व मोहोर असलेले मुळ प्रमाणपत्र दस्त यादी नि.क्र.४६सोबत अभिलेखावर दाखल केली आहे. वादी हिने मुळ दाव्यात असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. १ हे तिचे पती आहेत व वादीस प्रतिवादी क्र. १ कडून दरमहा पोटगी दाखल र. रु. १५,०००/– मिळावे. वादी हिने अशी विनंती केली आहे की, संपूर्ण थकीत पोटगीचा बोजा दाव्यातील परीच्छेद क्र. १अ व १ब मध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर ठेवणेत यावा. ही बाब निर्विवाद आहे की, प्रतिवादी क्र. १ हा आज रोजी हयात नाही व त्यामुळे वादीने त्याच्या विरुध्द केलेली पोटगीची मागणी निरर्थक झाली आहे. वादीची पोटगीची मागणी निरर्थक झाल्यामुळे थकीत पोटगीच्या रकमेचा बोजा वाद मिळकतीवर ठेवणेबाबतची मागणी सुध्दा निरर्थक ठरली आहे. माझे मते, माझे पुर्वाश्रमीचे पिठासीन अधिकारी यांनी वाद मुद्दे नि.क्र.७० प्रमाणे काढलेले वादमुद्दे क्र. ८ व ९ हे प्रतिवादी क्र. १ मरण पावल्यामुळे निरर्थक झाले आहेत. त्यामुळे मुद्दा क्र. ८ व ९ निष्काषीत करणे योग्य व न्यायाचे ठरेल. करीता, प्रस्तुत अर्ज मंजूर करणेत येतो व खालीलप्रमाणे

आदेश पारीत करतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करणेत येतो.
२. वाद मुद्यांपैकी मुद्दे क्र. ८ व ९ खारीज करणेत येत आहे.

SALIM PIRMAHAMAD SAYYAD
Digitally signed by SALIM PIRMAHAMAD SAYYAD
Date: 2025.09.22 12:09:25 +0530

दि.१८.०९.२०२५ (एस. पी. सैय्यद)

२रे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर.वडूज.